# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक २१.०१.२०२६

**कल्पेश चौरे, सहायक नगर रचनाकार, किशोर भोई, सहायक आरेखक, नगर रचना विभाग, धुळे व आनंदा हटकर, महसुल सहायक (महसुल शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांनी तक्रारदार यांचेकडे अनुक्रमे ३०,०००/— रुपये, १०,०००/— रुपये व १०,०००/— रुपये असे एकुण ५०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेच्या रकमेपैकी ३०,०००/— रुपये सहायक नगर रचनाकार कल्पेश चौरे यांनी स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | धुळे शहर पो.स्टे. गुरनं. /२०२६ |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि.२१.०१.२०२६ |
| **आरोपीतांचे नांव, वय व कार्यालय** | १. कल्पेश धनलाल चौरे, वय २८ वर्षे, सहायक नगर रचनाकार वर्ग— २,<br>२. किशोर भटा भोई, वय ४३ वर्षे, सहायक आरेखक,<br>**नेमणुक सहा. संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, धुळे**<br>३. दिपक आनंदा हटकर, वय ४० वर्षे, महसुल सहायक, महसुल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे, |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ३०,०००/— रुपये |

**<u>थोडक्यात हकिगत :—</u>** तक्रारदार यांच्या वडीलांच्या नांवे असलेल्या शेत जमिनीपैकी १०,००० चौ. मि. क्षेत्राचा ले आऊट नियोजित औदयोगिक प्रयोजनार्थ बिनशेती मंजुर होणेकरीता तक्रारदार यांनी वडीलांच्या नांवे दि.३१.१०.२०२५ रोजी ले आउट व आवश्यक त्या कागदपत्रांसह धुळे जिल्हाधिकारी कार्यालयास ऑनलाईन अर्ज करुन त्यांचे मुळ कागदपत्र जिल्हाधिकारी कार्यालयात जमा केले होते.

धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातुन सदर प्रकरण ले—आउट मंजुरीकरीता धुळे नगर रचना विभागाकडे पाठविण्यात आले होते. सदरचा ले—आउट मंजुर करुन देण्याकरीता सहा. आरेखक भोई यांनी स्वत: करीता व सहायक नगर रचनाकार चौरे यांचेकरीता असे ५०,०००/— रु. लाचेची मागणी करुन त्यापैकी १०,०००/— रु. भोई यांनी तक्रारदार यांच्याकडुन ऑनलाईन घेवुन उर्वरीत ४०,०००/— रु. काम झाल्यावर देण्यास सांगितले होते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात महसुल शाखेत कार्यरत असलेले महसुल सहायक आनंदा हटकर यांनी देखील बिन शेती आदेश देण्यासाठी स्वत: करीता तक्रारदार यांच्याकडे २०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची दि.१३.०१.२०२६ रोजी पंचांसमक्ष पडताळणी केली असता नगर रचना विभागाचे सहा. आरेखक भोई यांनी तक्रारदार यांच्याकडे स्वत: करीता १०,०००/— रुपये व सहायक नगर रचनाकार चौरे यांचेकरीता ३०,०००/— रु. लाचेची मागणी केली व सहा. नगर रचनाकार चौरे यांनी फोन वरुन तक्रारदार यांना त्यांचे पैसे सहायक आरेखक भोई यांचेकडेस देण्यास सांगितले, तसेच धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल सहायक हटकर यांनी देखील तक्रारदार यांच्याकडे १०,०००/—रू. लाचेची मागणी केली होती.

त्यानंतर दि.२१.०१.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान सहायक नगर रचनाकार कल्पेश चौरे यांनी तक्रारदार यांचेकडुन ३०,०००/— रु. पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| **सापळा पथक** | पदमावती कलाल, पोलीस निरीक्षक,<br>पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रविण मोरे, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, जगदीश बडगुजर |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

<u>"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"</u>


**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०
**व्हॉटसअॅप क्रमांक** :— ७७९८१६१०६४